**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजयकुमार दामोदर वनशीव
मु.पो.पारगाव, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, दौंड, ता.दौंड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारगाव,
ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजयकुमार दामोदर वनशीव
मु.पो.पारगाव, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, दौंड, ता.दौंड, जि.पुणे श्री.आय.वाय.पठाण

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारगाव,
ता.दौंड, जि.पुणे विद्यमान-श्री.जे.के.भांड तत्कालीन-श्री.अे.जे.लोणकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.१२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.१.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.विजयकुमार दामोदर वनशीव यांनी मागितलेली माहिती देण्यात आली. त्यांनी प्रथम अपील केलेले नाही. मागितलेली सर्व माहिती मिळाली असून काहीही तक्रार नाही, असे अपीलकर्त्याचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारगाव, ता.दौंड, जि.पुणे श्री.जे.के.भांड यांनी सुनावणीच्या वेळी आयोगापुढे सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
2 8 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अमिनखान हसनखान पठाण
पठाणवस्त, पो.चांदापुरी, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, लातूर, जि.लातूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगरअभियंता, (पाणीपुरवठा),
नगरपरिषद, लातूर, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, लातूर, जि.लातूर प्रतिनिधी श्री.के.ए.बामणकर

**जन माहिती अधिकारी** तथा नगरअभियंता, (पाणीपुरवठा),
नगरपरिषद, लातूर, जि.लातूर श्री.के.ए.बामणकर

त्यामुळे मूळ अर्ज प्राप्त करून घेऊन एक महिन्यात माहिती देण्याचे दि.१९.११.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त ठरले. त्यानुसार दि.३.१२.२००८ रोजी रजिस्टर्ड टपालाने श्री.पठाण यांना माहिती पाठविण्यात आली, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर, जि.लातूर यांनी दि.३०.३.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार विहित मुदतीत मूळ अर्जाला उत्तर/ माहिती देण्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगरअभियंता (पाणीपुरवठा), नगरपरिषद, लातूर, जि.लातूर श्री.संतोष फूलचंद देशमाने यांनी आयोगाला कार्यवाही न केल्याबद्दलचा खुलासा सादर करावा, त्यानंतर शास्तीबाबत निर्णय घेण्यात येईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र श्री.देशमाने यांनी अद्याप असा खुलासा सादर केलेला नाही, हे लक्षात घेता व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगरअभियंता (पाणीपुरवठा), नगरपरिषद, लातूर, जि.लातूर श्री.संतोष फूलचंद देशमाने शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.अमिनखान हसनखान पठाण यांचा माहिती-मागणीचा मूळ अर्ज दि.१६.७.२००७ चा असून, दि.३.१२.२००८ रोजी, माहिती देण्यात आली आहे. १४९ दिवसांनी म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार मान्य असलेले विहित मुदतीचे ३० दिवस वगळता अपीलकर्त्यास माहिती मिळण्यास ११९ दिवस विलंब झाला आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगरअभियंता (पाणीपुरवठा), नगरपरिषद, लातूर, जि.लातूर श्री.संतोष फूलचंद देशमाने हे त्यास जबाबदार असून त्याबद्दल श्री.संतोष फूलचंद देशमाने यांना रूपये २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, लातूर, जि.लातूर यांनी

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगरअभियंता (पाणीपुरवठा), नगरपरिषद, लातूर, जि.लातूर श्री.संतोष फूलचंद देशमाने यांच्या जून २०१०, जुलै २०१०, या महिन्यांच्या अनुक्रमे जुलै २०१०, ऑगस्ट २०१० मध्ये मिळणाऱ्या वेतनातून दोन समान हप्त्यांत ही शास्ती वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.देख्या मुरलीधर पवार
मु.पो.पाथरे, ता.करमाळा, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाथ प्राईड,
पहिला मजला, सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, विद्या विकास मंडळ,
करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.देख्या मुरलीधर पवार
मु.पो.पाथरे, ता.करमाळा, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, विद्या विकास मंडळ,
करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.व्ही.पी.सूर्यवंशी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.९.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.९.५.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली कोणतीही माहिती दिली नाही. माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी देऊनही जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, विद्या विकास मंडळ करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर यांनी पूर्तता केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.देख्या मुरलीधर पवार यांनी केली.

श्री.पवार यांचा दि.१६.१.२००८ चा अर्ज पुरेसे मुद्रांक शुल्क लावले नसल्यामुळे नाकारला. या अर्जाची सत्यप्रत सहीशिक्क्यानिशी देण्याची मागणी त्यांनी दि.१५.२.२००८ च्या अर्जान्वये केली. आपण दारिद्र्यरेषेखाली असल्याचे त्यांनी म्हटले असले तरी तसा खात्रीशीर पुरावा देणे आवश्यक होते. असे असूनही अपीलकर्त्याच्या मागणीनुसार माहिती तयार करून दिली व पाठविण्याची सूचना संस्थेच्या कर्मचाऱ्याला दिली. त्यांनी ती पाठविण्यास त्यांच्या व्यक्तिगत कारणांमुळे विलंब लागला. त्याबद्दल संबंधित कर्मचाऱ्याला दि.१०.११.२००८ रोजी समज देऊन खुलासा घेतला. तत्कालीन सचिव श्री.विलास रामचंद्र घुमरे यांनी अशी कार्यवाही केली, माहिती

नाकारण्याचा उद्देश नव्हता, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, विद्या विकास मंडळ करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.पी.सूर्यवंशी यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
28 MAY 2010